# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०९.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०८.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून ४,९००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून, १,४५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२६१वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९३,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) बजाजनगर पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे ००.२५ वा. ते ०१.०० वा. चे दरम्यान, बजाजनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, सावरकर नगर चौक, ऑरेंज सिटी हॉस्पीटल जवळ एक ईसम संशयीत हालचाली करतांना दिसून आला पोलीसांनी त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेवून, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अश्पाक मुनिर अंसारी, वय २७ वर्षे, रा. दंतेश्वरी वस्ती, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश जा. क्र. ३७३७/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना, कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतीषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (अती कार्य. सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. चेतनसिंग चौहाण, पोहवा. चंद्रशेखर, छगन कवाडे, मपोहवा. राणी करंडे व पोअं. योगेश्वर गायकवाड यांनी केली.

**३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०८.०५.२०२६ चे १९.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना माहिती मिळाली की, बाबा नानक प्रोव्हिजन्स नावाचे दुकान मालक आपले ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य सिगरेटचा साठा बाळगून आहे. अशा प्राप्त खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, प्रबुध्द नगर, जुना कामठी रोड येथील बाबा नानक प्रोव्हिजन्स नावाचे दुकानात पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी राजकुमार श्रीचंद सचदेव, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट नं. ८१/२, गोकुलधाम, आशा हॉस्पीटल मागे, नवीन कामठी, नागपूर याने आपले दुकानात सिगारेटचे बॉक्स विक्रीकरीता बाळगुन असल्याचे दिसुन आले. पंचासमक्ष बॉक्समधील सिगारेट पॅकेटची पाहणी केली असता, त्यावर परदेशी बनावटीचे तसेच, सिगारेटच्या पॅकेटवर भारत सरकार स्वाथ्य व परिवहन कल्याण मंत्रालय यांचे अनिवार्य असलेले व कायद्याने विहीत केल्याप्रमाणे लेखी अथवा चित्रीत वैधानिक ईशारा अंकीत केला नसल्याचे आणि उत्पादनाबाबत व कालबाह्य मुदतीबाबत स्टॅम्प किंवा चिन्ह दिसून आले नाही. आरोपीचे ताब्यातुन शासनाने प्रतीबंधीत केलेले तंबाखुजन्य सिगारेट १) ESSE SPECIAL GOLD THE LEADERS SIGNATURE Made Under authority of KT and G, Koria नावाचे ४७ बॉक्स किंमती ३२,९००/—रू. २) DJRUM BLACK CLOVE CIGARATTES Made By PT DJRUM KUDUS INDONESIA नावाचे ५० बॉक्स किंमती २५,०००/—रू. असा एकुण ५७,९००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य सिगारेट साठा बेकायदेशीर, अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम ३(ओ), २, २० सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. गजानन गुल्हाने, पोहवा. अरविंद गेडेकर, पवन गजभिये, विवेक अढाऊ, मपोहवा. अनुप यादव व चापोअं. राहुल पाटील यांनी केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे वाडी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०८.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना एल.बी.देशी बार व बिअर शॉपी, वडधामणा, अमरावती—नागपूर रोड, वाडी येथे एक ईसम संशयीतरित्या पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रविकुमार रामसखा दहिया, वय २८ वर्षे, रा. अमर

नगर, वॉर्ड क्र. ०१, हिंगणा रोड, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिश्यात एक लोखंडी चाकु किंमती १००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे सपोनि. साईप्रसाद केंद्रे ९९७५५८०२२२ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— सोन्याचे दुकानात चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी मनोज दयाशंकर शहा, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. ०३, गेडाम ले—आऊट, आयसी चौक, मंगळवारी बाजार, मुकुंद रेस्टॉरेन्टचे बाजूला, एम.आय.डी.सी., नागपूर यांचा सोने—चांदी दागिणे गहाण ठेवुन घेण्याचा व्यवसाय असुन, गेडाम ले—आऊट, आयसी चौक येथे ''मोनाली स्टील व मोनाली ज्वेलर्स'' नावाचे दुकान आहे. दिनांक ०८.०५.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास नेहमीप्रमाणे फिर्यादी हे आपले दुकानाला कुलूप लावून घरी गेले असता, अनोळखी चार चोरट्यांनी फिर्यादीचे दुकानाचे शटरचे लॉक तोडुन, आंत प्रवेश करून सोन्या—चांदीचे दागीने व रोख असा एकुण किंमती ४२,१०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी सी.सी.टी.व्हि. पाहणी केली असता, दिनांक ०८.०५.२०२६ चे ०४.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान, तोंडाला बांधून असलेले चार अनोळखी ईसम चोरी करतांना दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी येथे पोउपनि. दिलीप थोरवे ८९२७४२७८४२ यांनी अनोळखी चार आरोपींविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

नागपूर शहरातील रस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी तसेच, अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर प्रभावी कारवाई करण्याच्या उद्देशाने वाहतूक विभागामार्फत अत्याधुनिक ड्रग टेस्ट मशीन कार्यान्वित करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विकेन्ड पार्टी आणि पबवरती जाणाऱ्यांवर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

सदर ड्रग टेस्ट मशीनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन अधिकारी तसेच, आवश्यक पोलीस स्टाफ यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना संबंधित तांत्रिक प्रशिक्षण व कार्यपद्धतीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वाहन चालकांकडून गांजा, अफु, हेरॉईन, कोकेन, सायकोट्रॉपिक ड्रग्ज इत्यादी अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालविले जात असल्यास सदर मशीनच्या माध्यमातून तपासणी करण्यात येणार आहे. तपासणी

दरम्यान दोषी आढळणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच नागपूर शहर परिसरामध्ये अमली पदार्थाचे सेवन करून वाहन चालवत असताना वाहन चालक दिसून आल्यास ११२ या नंबरवरती कॉल करून माहिती द्यावी.

नागरिकांनी स्वत:च्या तसेच इतरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन नागपूर शहर वाहतूक पोलीस विभागामार्फत करण्यात येत आहे.

**( लोहित मतानी, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर